# दारुमुक्तीसाठी नव्या धोरणाकडे

## डॉ. अभय बंग

पाच वर्षापासून गडचिरोली जिल्ह्यात सुरु असलेल्या व्यापक दारुमुक्ती आंदोलनास यश येऊन शासनाने जिल्ह्यातील दारु बंद केली. गडचिरोलीच्या दारुमुक्ती आंदोलनास समर्थन जाहीर करुन महाराष्ट्रातील ७० मान्यवर साहित्यिक, कलावंतांनी या प्रश्नावर प्रचलितापेक्षा वेगळी भूमिका घेतली. परवा मुख्यमंत्री श्री. शदर पवारांनी जाहीर घोषणा केली की "कोणत्याही गावाच्या ग्रामपंचायतीने किंवा तेथील महिलांनी मागणी केल्यास तेथील दारु दुकाने शासन रद्द करेल."

तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रात हद्दपार करण्यात आलेल्या दारुबंदीचे हे पुनरागमन आहे का? महाराष्ट्राला पुन्हा दारुबंदी हवी आहे का ? दारुच्या समस्येवर जुन्या दारुबंदीऐवजी काही नवे उपाय शोधता येतील का ?

पहिला प्रश्न तर हा निर्माण होतो की स्वातंत्र्यानंतर असलेली दारुबंदी १९६३ मधे कां उठवली ? त्यावेळी देण्यात आलेली प्रमुख कारणे अशी होती :

- दारुबंदी असूनही बेकायदेशीर दारु सर्वत्र विकली जाते. म्हणजेच दारुबंदी पूर्णपणे अयशस्वी ठरली आहे.

- हातभट्टीची अशुध्द व कधी-कधी विषारी दारु अपायकारक असू शकते. पिणाऱ्यांना ती निरुपायाने प्यावी लागते.

- दारुबंदीची अंमलबजावणी पोलीस करु शकत नाहीत, उलट त्यामुळे पोलीस भ्रष्ट होतात.

- त्यापेक्षा कायदेशीररीत्या शुध्द दारु विकून त्यावरील करांद्वारे सरकारने लोक-कल्याणकारी कार्यक्रमासाठी पैसा उभारावा.

### दारु-वर्धक धोरणाची तीस वर्षे

दारुवर्धक धोरणाचा अनुभव तीस वर्षे घेतल्यानंतर आता ते पुन्हा तपासून बघण्याची वेळ आली आहे. दारुबंदीविषयी घेण्यात आलेले पहिले तीन आक्षेप आजच्या मोकाट धोरणाला तेवढेच किंवा अधिकच लागू पडतात. कायदेशीर दारुवर प्रचंड कर लावल्यामुळे ती महाग झाली, म्हणून बेकायदेशीर दारु मोठ्या प्रमाणात विकली जाते. गेल्या वर्षी मुंबईमध्ये शासकीय परवानाधारक दुकानातील दारु पिऊन शंभरावर लोक मेले. कटक शहरात दारु खुली असूनही स्वस्त, भेसळीची दारु पिऊन दोन वर्षांपूर्वी तेवढेच लोक मेले. आणि हे तर अपघाती, पण उघड झालेले मृत्यू होत. दारुचा वापर समाजात बेसुमार वाढल्याने तिच्या वैद्यकीय दुष्परिणामांनी मरणाऱ्यांची आकडेवारीच अुपलब्ध नाही. ती निश्चितच यापेक्षा अनेक पटींनी मोठी आहे. दारु खुली केल्याने दारु-व्यापारातील पोलीसांचा भ्रष्टाचारही कमी झालेला

दिसत नाही. दारुबंदीबाबत असलेला चौथा आक्षेप – तिच्यामुळे शासनाला पैसा कमावता येत नाही – तो मात्र खुल्या दारुनीतीमुळे पूर्णपणे दूर झाला! पण दारुला कायदेशीर करुन त्यातून मिळणारे अुत्पन्न हे कसे निर्माण होते ?

लहानपणी ऐकलेली गोष्ट आठवते. दोन भाअू होते. मोठा भाअू भोळा, तर छोटा भाअू बनेल होता. दोघांची वाटणी झाली. शेवटी एक म्हैस उरली. तिला कशी वाटणार ? छोटा भाअू म्हणाला, “दादा, असं करु, म्हशीचा पुढचा डोक्याकडचा भाग तुला, मागचा घाण भाग माझा.” मोठा भाअू तयार झाला. तेव्हापासून मोठा भाअू रोज म्हशीला नियमित वैरण, चारा खाअू घालतोय व छोटा भाअू नियमित दूध काढून लोण्यावर ताव मारतो आहे. वाटणीची अटच तशी नव्हती का ?

आजचे दारुवर्धक धोरण म्हणजे असल्याच वाटणीची विदारक कथा आहे. मोठ्या भावाने, म्हणजे जनतेने, दारु प्यायची व छोट्या भावाने त्यावर कमाई करायची.

हा छोटा भाअू कोण **?**

– महाराष्ट्र शासन! शासनाला ९२-९३ मधे दारुपासून ६०० कोटी रुपये अबकारी कर मिळाला. ९३-९४ मधे ८०० कोटी रुपये अपेक्षित आहेत.

– साखर कारखानदार! साखर कारखान्यांचे मुख्य उत्पन्न आता दारु-अुत्पादनापासून आहे. साखर हे तर बायप्रॉडक्ट आहे. ‘साखरसम्राट’ ही अुपाधी बदलवून त्यांना आता ‘दारुसम्राट’ म्हणायला हवे. राज्य पातळीवरील राजकारण ह्या मंडळींच्या हातात आहे.

– दारु विकणारे ठेकेदार! त्यांना दारु विकण्याची दुकाने वर्षानुवर्षे देअून प्रचंड उत्पन्नाचे काय साधन निर्माण करुन देण्यात आले आहे. शिवाय अत्यंत कमी परवाना फी ठेवून त्यांना जवळपास ५०० कोटी रुपये वार्षिक सबसिडी बहाल करण्यात आली आहे. कारण ?

– सत्ताधारी पक्षाला निवडणुकीसाठी पैसे पुरवण्याची व्यवस्था या दारुच्या ठेकेदारांकडून झाली. पुढे ‘इतरांना निवडून येण्यास पैसे कां पुरवायचे ? आपणच निवडणूक कां लढवू नये ?’ असा हिशोबी विचार त्यांनी केला. (राजकारण हा दारुविक्रीपेक्षा अधिक फायद्याचा धंदा असल्याचे लक्षात आल्यामुळे असा विचार होणे क्रमप्राप्तच होते.) हळूहळू ते स्वतःच नेते बनले. त्यामुळे मुंबई-ठाणे भागातील पप्पू कलानी व हितेंद्र ठाकूरच्या धर्तीवर इतरत्र या मंडळींनी त्यांच्याकडे मुबलक असलेली दारु, पैसा व गुंड ही तीन हत्यारे निवडणुकीत मुक्तपणे वापरुन सुजाण लोकशाहीसाठी आवश्यक असलेली निवडणूक प्रक्रिया सडवली.

विकास-विरोधी दारु

या कथेतला मोठा भाअू म्हणजे जनता! म्हशीला चारा खाअू घालण्यासाठी लोकांना किती किंमत चुकवावी लागते ?

– कायदेशीर बेकायदेशीर मिळून महाराष्ट्रात दरवर्षी ३००० कोटी रुपयांची दारु विकली जाते. म्हणजेच प्रत्येक पुरुष सरासरी २००० रुपयांची दारु वर्षाला पितो आहे. यात वाढ व्हावी असा प्रयत्न शासन करीत आहे. (देवीलाल व त्यांचे सुपुत्र हरियाणात राज्य करीत असताना त्यांनी अशी प्रोत्साहन योजना सुरु केली की गावात विकल्या गेलेल्या दारुच्या प्रत्येक बाटलीमागे त्या ग्रामपंचायतीला अेक रुपया बक्षीस मिळेल. म्हणजे, ग्रामपंचायती दारुच्या प्रचारक व्हाव्यात!)

– दारुमुळे विविध रोग होतात (पोटात अल्सर, लिव्हरचा सिरोसीस, लैंगिक दोष, हृदयरोग, न्युरोपॅथी, विस्मृती, वेड, आत्महत्या इ.) दारुमुळे पोटाचे कॅन्सर दहा पटींनी वाढतात. नेहमी पिणाऱ्याचे आयुष्य सरासरी १५ ते २० वर्षांनी कमी होते. यावरुन दारुमुळे होणाऱ्या अकाली पुरुष-मृत्यूंची कल्पना करता येईल. एका गडचिरोली जिल्ह्यातच दारुमुळे दरवर्षी १००० पुरुष मरायचे! स्वीडनमधे केलेल्या एका संशोधनात असे आढळले की मध्यमवयीन (३५-६४ वर्षे) पुरुषांच्या मृत्यूमागचे  सर्वांत मोठे कारण दारु आहे.

– अपघात, गुन्हे, भांडणे, मारामाऱ्या, खून, स्त्रियांवर अत्याचार यामागे एक महत्वाचे कारण दारु आहे. अशा घटनांमधील अर्धे पुरुष दारुच्या नशेत असतात.

– दारु पिणाऱ्या पुरुष कामगारांची उत्पादकता कमी होते, कर्मचारी अनुपस्थित राहतात. झिंगून पडलेले कर्मचारी व त्यामुळे खोळंबलेली कामे हा सार्वत्रिक अनुभव आहे. सत्तेवर आल्यावर गोर्बाचेव्हने सोवियत रशियामधे अंमलात आणलेली पहिली सुधारणा दारु कमी करणे ही होती. दारुमुळे व्यक्ती व समाजाची उत्पादकता व कार्यक्षमता कमी होते हे त्यामागचं कारण होतं. इंग्लंडमधे असा अनुभव आला की दारु जास्त पिणारे कामगार व कर्मचारी वर्षातून ६० दिवस आजारपणामुळे अनुपस्थित राहतात, तर कमी पिणारे किंवा न पिणारे वर्षातून १२ दिवस.

– कमावत्या पुरुषाने कमाईचे पैसे कुटुंबाला न देता दारुत घालवल्याने घरात उपासमार होते व स्त्रियांना मार व अपमान सोसावे लागतात. गडचिरोली जिल्ह्यातील आंबेशिवनी गावातील घटना. गावतुरे नावाच्या तरुण पुरुषाने दारु पिऊन घरी परतल्यावर ‘मटन शिजवलं नाहीस’ म्हणून उपाशी असलेल्या बायकोला मार तर दिलाच, पण दारुच्या नशेत आपल्या दीड वर्षाच्या मुलीला विहिरीत फेकून दिले. मुलगी मेली!

महाराष्ट्र शासनाला मिळणाऱ्या ६०० ते ८०० कोटी रुपयांसाठी समाजाने ३००० कोटी रुपये व इतर सर्व किंमत मोजावी का ?  हे ६०० कोटी रुपये विकास व कल्याणकारी कार्यक्रमांसाठी हवे असे शासन म्हणते. पण राजीव गांधींनी म्हटल्याप्रमाणे, शासनाला मिळणाऱ्या पैशापैकी ८५ टक्के भाग हा इमारती बांधणे व कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च होतो. शेवटी लोकांपर्यंत फक्त १५ टक्के भाग, म्हणजेच ६०० कोटींपैकी १०० कोटी रुपये पोहचतात.

लोकांना दारु पाजून ३००० कोटी रुपये घ्यायचे व शेवटी १०० कोटींचा लाभ त्यांना परत द्यायचा म्हणजे १ रुपयाच्या फायद्यासाठी ३० रुपये खर्च करायला सांगणारा हा आतबट्ट्याचा व्यवहार आहे. लोकांचा खिसा तर रिकामा होतो, पण बदल्यात फायदा काही मिळत नाही. कारण काय ते लोकांच्या लक्षात येत नाही.

जुन्या काळी एका राजाला असाच प्रश्न पडला होता. कर गोळा होतो पण खजिना रिकामाच कां राहतो ? राजाच्या शहाण्या मंत्र्याने काही न बोलता एक प्रात्यक्षिक करुन दाखवले. राजाच्या हातून एक बर्फाचा मोठा तुकडा पहिल्या दरबाऱ्याच्या हातात दिला, एका हातातून दुसऱ्या हातात जात शेवटच्या दरबाऱ्यापर्यंत बर्फाचा बारीक कण पोहोचला. दारुमधे लोकांचा खर्च होणारा पैसा शासनाच्या लांबलचक यंत्रणेमधून पार होऊन पुन्हा लोकांपर्यंत विकासाच्या रुपात पोहोचत नाही.

दारुच्या करामधून विकास हा निव्वळ भ्रम आहे! खरे तर दारु ही विकास-विरोधी आहे.

निष्कर्षः दारुवर्धक धोरण अयशस्वी व भयंकर नुकसानकारक ठरले आहे!

## दारु विरुध्द लोक

जोडा चावतो हे जोडा घालणाऱ्याला चांभारापेक्षा अधिक चांगलं कळतं! दारुचे दुष्परिणाम अगोदर कुणाच्या लक्षात आले ? स्त्रियांच्या! गडचिरोलीच्या दारुमुक्ती आंदोलनात साहजिकच स्त्रिया अग्रस्थानी होत्या.

आंध्रमधील देशी दारु-विरोधी महिलांचे आंदोलन इतके प्रचंड होते की आंध्रचे राजकीय पक्ष व शासन या एका प्रश्नाभोवती गरागरा फिरायला लागले. शेवटी एप्रिल ९३ मध्ये आंध्र सरकारने घोषणा केली की २ ऑक्टोबर ९३ पासून पूर्ण प्रांतात देशी दारु बंद करण्यात येईल.

तामिळनाडूमध्ये पैशाच्या लोभाने शासनाने सुलभ दारु-पुरवठा योजना सुरु केली होती. दुधाच्या पॉकिटासारखी दारुची पाकिटे घरपोच मिळण्याची लोककल्याणाची योजना! यामुळे क्षुब्ध झालेल्या महिलांच्या भावना नेमक्या ओळखून जयललिता यांनी आपल्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात दारुबंदीचे आश्वासन दिले, भरघोस मतांनी निवडून आल्यावर आंशिक दारुबंदी केली.

हरियाणात महिला व जाट पंचायती यांनी दारुवर बहिष्कार व दुकाने बंद करण्याचे आंदोलन सुरु केले आहे. अरुणाचल प्रदेशात तर महिलांच्या आंदोलनामुळे ('मदर्स मूव्हमेंट') तेथील सरकारने ४ वर्षांपूर्वीच पूर्व प्रांतात दारुबंदी घोषित केली आहे.

भारतातील बहुतांश समाजाला व संपूर्ण महिला वर्गाला समाजात खुली दारु नको हे स्पष्ट करणारी ही आंदोलने आहेत. केवळ आंधळे किंवा दारुने वा दारुपासून मिळणाऱ्या पैशांनी झिंगलेलेच या प्रचंड जनभावनेकडे दुर्लक्ष करु शकतील.

## वैचारिक अडसर

दारुच्या प्रश्नावर विचार करण्यात काही वैचारिक अडसर समाजमनात निर्माण झाले आहेत. दारुबंदी यशस्वी झाली नाही, आता खुल्या धोरणाशिवाय अन्य पर्यायच नाही या

भ्रमजालात समाज गुंतला आहे. पर्याय आहेत. ते शोधावे लागतील. पूर्वीचे प्रयत्न का अयशस्वी झाले यापासून शिकावे लागेल.

दारुबंदी असफल कां झाली ? या प्रश्नाची दोन उत्तरे आहेत. एक, दारुबंदी असफल झाली हा भ्रम आहे. महाराष्ट्रातील वर्धा जिल्हा किंवा बाहेर गुजराथचे अुदाहरण  अयशस्वी दारुबंदी  म्हणून देण्यात येते. पध्दतशीरपणे केलेल्या अध्ययनांनी दाखवून दिले आहे की वर्धा जिल्हा किंवा गुजराथमधे दारुचा एकूण वापर हा दारु खुली असलेल्या विभागांपेक्षा आजही कमी आहे. गडचिरोली जिल्ह्यातील ४२ गावांच्या सर्वेक्षणात असे आढळले की दारुबंदीनंतर दारुचा वापर ७० टक्क्यांनी कमी झाला. पण बेकायदेशीर दारु काही प्रमाणात देखील उपलब्ध असली म्हणजे "दारुबंदी अयशस्वी झाली" असा निष्कर्ष शहाणी मंडळी काढतात. रावणाकडे राहिली म्हणजे सीता चरित्र्यहीन झाली असा धोब्याने निर्णय द्यावा व बिचाऱ्या सीतेला वारंवार आपल्या चारित्र्याबद्दल कठोर परिक्षा द्यावी लागावी तसा हा प्रकार आहे. फार तर एवढेच म्हणता येईल की दारुबंदी १०० टक्के यशस्वी झाली नाही. पण तरीही तिच्यामुळे दारुचा वापर काही प्रमाणात नियंत्रित झाला आहे.

मग दारुबंदीच्या आंशिक असफलतेची कारणे कोणती ?  पुन्हा एकदा वर्धा जिल्हा व गुजराथ येथील अनुभव आपण पाहू.

- दारुबंदीमागे जनतेचे सँक्शन नव्हते, किंवा समाप्त झाले होते. वर्ध्यामधे गांधीजींचे नाव विनोबांची इच्छा यामुळे दारुबंदी १९७७ मधे लागू करण्यात आली. जनतेने दारुचे दुष्परिणाम फारसे भोगले नसल्याने दारुबंदीची कळकळीची गरज लोकांना जाणवली नव्हती.

- दारुबंदी करताना दारु पिण्याची हजारो 'हेल्थ परमिट  मुक्त हस्ताने देण्यात आली. प्रत्येक परमिटवर १२ शिशा विकत घेता व बाळगता येत असल्याने या परमिटचा वापर करुन गावोगाव दारु विकण्याचे जाळे निर्माण करण्यात आले.

- दारुबंदीच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी पोलीस यंत्रणेवर टाकण्यात आली. जनतेचा काही सहभाग नव्हता.

- गुजराथमधील दारुबंदीचे अध्ययन करण्यास नेमण्यात आलेल्या न्या. मियाभाई कमिशनने असा निष्कर्ष काढला की राजकीय नेते, गुन्हेगार व पोलीस यांचे विघातक संगनमत झाल्याने दारुबंदीची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नाही.

"कायद्याने दारु नियंत्रणाचा प्रयत्न करणे निष्फळ आहे. समाजसेवकांनी प्रबोधन करुन दारु पिण्यापासून लोकांना परावृत्त करावे." असा एक तर्क राज्यकर्ते बरेचदा देतात.

गंमत अशी की ब्रिटिश राज्यकर्ते नेमका हाच सल्ला गांधीजींना द्यायचे. त्यावर गांधीजींनी म्हटले होते की, "समाजात दारुचा अनिर्बंध पुरवठा होत असताना निव्वळ लोकशिक्षण करुन दारुपासून समाजाला वाचवण्याचे प्रयत्न विफल होतात, या ठाम निष्कर्षाला मी आलो आहे." आंध्रच्या अेका मंत्र्याने दारुविरुध्द आंदोलन करणाऱ्या महिलांना शहाजोग सल्ला दिला, "बायांनो, दारुबंदीची मागणी करण्याऐवजी तुम्ही आपल्या नवऱ्यांना सुधारा, म्हणजे दारु आपोआप बंद होईल". त्यावर बायांनी मंत्र्याला सुनावलं, "साहेब, तुमची बायको आजपर्यंत तुम्हाला सुधारु शकली नाही, मग आम्ही आमच्या नवऱ्याला कसं सुधारणार ?"

दारुबंदी कायद्याची नीट अंमलबजावणी करता येत नाही असं म्हणून राज्यकर्त्यांना हात झटकता येणार नाहीत. अपूर्ण का होईना, दारुवर कायदेशीर नियंत्रण करण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. केनेथ रॉथमनने वैज्ञानिक संशोधनाच्या बाबतीत म्हटले आहे, "I cannot succeed fully, but rather must fail in my attempts to varying degrees." सामाजिक सुधारणा अशाच अनेक अपूर्ण पण आंशिक सफलतांनी मिळून होत असते. त्यातील असफल भागावर बोट ठेवून कोणी सामाजिक सुधारणा बंद करु शकत नाही.

दारुच्या प्रश्नाबाबत विचार करताना प्रमुख वैचारिक अडसर कोणता असेल तर खाईन तर तुपाशी नाही तर उपाशी प्रमाणे शंभर टक्के सफलता न मिळणे म्हणजे असफलता हा न्याय होय. पायरी-पायरीने वर चढण्याची व त्यात अपरिहार्यपणे पडण्याचीही तयारी ठेवणे समाजाला आवश्यक आहे. दारुबंदीचा परिणाम 'सफलता किंवा असफलता' अशा पांढऱ्या-काळ्या रंगात न मोजता 'किती प्रमाणात दारु कमी झाली' अशा आंशिक व संख्यात्मक स्वरुपात मोजूनच तोलावा लागेल.

एका खोलीत एक माशी खिडकीला लावलेल्या काचेच्या तावदानातून पलीकडे जाण्याचा प्रयत्न करत होती. काचेवर वारंवार आपटून पडत होती, पण पुन्हा प्रयत्न करत होती. गुरुने शिष्याला विचारले, "या माशीकडे बघून तुम्ही काय शिकाल ?"

"सतत प्रयत्नशीलता! निराश न होता पुन्हा प्रयत्न करण्याची वृत्ती!" - शिष्य म्हणाला.

"असा प्रयत्न ती आयुष्यभर करत राहिली तरी ती यशस्वी होणार नाही. उलट काचेवर डोके आपटून मरेल." - गुरु म्हणाले.

"मग काय शिकता येईल ?" - शिष्याने विचारले.

"या खोलीतून बाहेर जाण्यासाठी माशीला या बंद खिडकीव्यतिरिक्त अनेक इतर उघडे मार्ग आहेत. एवढेच काय, तर ज्या दारातून ती या खोलीत शिरली व अडकली ते दारही तिला परतण्यासाठी उघडे आहे. पण माशी त्या एकाच खिडकीमधे मानसिकदृष्ट्या फसली आहे. एकाच भिंतीवर डोके आपटल्याने प्रश्न सुटत नसतील तर नेहमीच दुसरा काहीतरी मार्ग शक्य असतो. आपण तो बघत नाही एवढेच." - गुरुने उत्तर दिले.

आता खुल्या धोरणाबद्दल जनतेत सर्वत्र भ्रमनिरास व क्षोभ उत्पन्न झाला असल्याने दारु-नियंत्रणाला जनतेचा नव्याने पाठिंबा मिळाला आहे. या नव्या परिस्थितीत दारु-नियंत्रण कसे करता येईल ? वर्धा व गुजराथच्या अनुभवांवरुन काढलेला निष्कर्ष व गडचिरोली जिल्ह्यातील जनतेचा दारुमुक्तीचा अनुभव यांचा आधार घेऊन आपण नवीन दारु-धोरणाचा आराखडा आखू. वर म्हटल्याप्रमाणे तो अपरिहार्यपणे अपुरा व प्रयोगशील असेल.

नवीन दारु-नियंत्रण धोरणाचा आराखडा

- समाजातील दारुचा वापर कमी करायचा आहे असा धोरणात्मक निर्णय शासनाने घ्यावा. निव्वळ कराच्या लोभापायी दारुच्या वापराला प्रोत्साहन देऊन भस्मासुर निर्माण करणे थांबवावे.

- यापुढे दारुच्या नवीन दुकानांना परवाने देणे बंद करावे.

- साखर कारखान्यांतून निर्माण होणाऱ्या अल्कोहोलचा उपयोग निर्यात, उद्योग, किंवा इंधन या दिशेने वळवावा. पिण्यासाठी दारुचे उत्पादन सध्याच्या पातळीवर गोठवावे व पुढील दहा वर्षात क्रमशः कमी करत न्यावे.

- लोकशाहीला वाचवण्यासाठी राजकीय नेते व दारुचा व्यापार यांमधील विषारी संबंध तोडणे आवश्यक आहे. राजकीय पक्षाचा सदस्य किंवा निवडणुकीचे उमेदवार यांचे किंवा यांच्या जवळच्या नातेवाईकांचे दारुचे दुकान असू नये असा नियम करावा.

- दारुपासून मिळणारा कर शासनासाठी (नेते, नोकरशाही) दुभती गाय व मोकळे कुरण झाले आहे. दारुचा खप वाढवण्याचा मोह त्यामुळे होतो. हे अवांछित व अनैतिक आहे. दारुपासून मिळणाऱ्या कराचा पैसा दारुमुळे निर्माण झालेले प्रश्न व उध्वस्त झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन यासाठीच वापरण्याचे बंधन लावण्यात यावे. आवश्यक असल्यास नागरिकांनी यासाठी न्यायालयाची मदत घ्यावी.

- गाव किंवा महिला म्हणतील तिथले दारु-दुकान बंद करण्याची शरद पवार यांची घोषणा ही पंचायत राज्याची पुनर्जीवित करण्यात आलेली योजना, तसेच स्त्रियांची समाजातील वाढती भूमिका या नव्या परिस्थितीशी सुसंगतच आहे. या घोषणेला ताबडतोब कायद्याचे स्वरुप द्यावे.

- 'गाव म्हणेल' म्हणजे कोण म्हणेल ? ग्रामपंचायतीतल्या ५-१० निवडलेल्या प्रतिनिधींना हा अधिकार देऊन नये. निवडून आलेल्या मोजक्या प्रतिनिधींना विकत घेणे दारु-विक्रेत्यांना सहज शक्य असते. गडचिरोलीतील कोटगल गावात एका दारु-दुकानदाराला दुकान उघडावयाचे होते. त्यासाठी ग्रामपंचायतीचे 'ना हरकत' प्रमाणपत्र सरपंच देत नव्हता. "गावात मंदिर बांधण्यासाठी दहा हजार रुपये दान देतो" या लालुचेपासून तर ग्रामपंचायतीच्या दोन सदस्यांना पैशांनी प्रलोभित करण्यापर्यंत सर्व पध्दती वापरुन ठेकेदाराने सरपंच बदलण्याचा घाट घातला. मग गावातील स्त्रियांनी मोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले की "ग्रामपंचायतीने 'हरकत नाही' असे प्रमाणपत्र दिले तरी आम्हाला आमच्या गावात दारु-दुकान येण्यास हरकत आहे." शेवटी दारु-दुकानदाराचा बेत बारगळला.

गावाची ग्रामसभा ही ग्रामरचनेचा मूलभूत पाया असलेली व कायद्याने मान्य केलेली संस्था आहे. गावातील सर्व वयस्क स्त्री-पुरुष मिळून ही ग्रामसभा बनते. आजही वर्षातून निदान दोनदा ग्रामसभा बोलवून तिचे सँक्शन घेणे ग्रामपंचायतीला बंधनकारक आहे. ही ग्रामसभा म्हणजेच खरे गाव असल्याने दारुचे दुकान हवे की नको याचा निर्णय ग्रामसभेत घ्यावा. ग्रामसभा म्हणेल त्या गावातील दारुचे दुकान शासनाने ताबडतोब रद्द करावे, अन्यत्र बदली करु नये.

- ज्या जिल्ह्यातील ५१ टक्के किंवा अधिक ग्रामसभा "दारु नको" असा निर्णय घेतील त्या जिल्ह्यात गडचिरोली जिल्ह्याप्रमाणे शासकीय दारुबंदी लागू करावी. गावांप्रमाणे शहरात असा सामूहिक निर्णय होणे कठीण आहे. पण शहरांतील दारु-दुकानांमुळे गावात दारु पसरते. म्हणून ज्या जिल्ह्यातील किमान ५१ टक्के गावे दारु नको म्हणतील त्या जिल्ह्यातल्या शहरातील देखील दारु-दुकाने बंद व्हावीत.

- दारु-नियंत्रणाचे अधिकार केवळ पोलीसांच्या हाती न ठेवता त्यासाठी उत्सुक असलेल्या व उत्साहाने ओसंडून वाहणाऱ्या स्त्रियांचा, युवकांचा, जनतेचा सहभाग घ्यावा. खरे तर त्यांच्याच हाती नियंत्रणाची जबाबदारी देऊन ते मागतील तिथे पोलीसांनी सहभाग घ्यावा. "गावाची दारुमुक्ती" ही संकल्पना व त्याची व्यावहारिक बाजू गडचिरोली जिल्ह्यातील दारुमुक्ती आंदोलनाच्या दरम्यान विकसित झाली आहे. एक-दोन अपवादात्मक नाही, तर ७५ गावांनी आपल्या गावात दारुमुक्तीचा निर्णय घेऊन ती यशस्वीरीत्या अंमलात आणून दाखवली आहे. ग्रामसभेचा निर्णय, स्त्रिया व युवकांच्या दारुमुक्ती दलांची स्थापना, ग्रामसभेच्या मार्गदर्शनाखाली दारुमुक्ती दलांद्वारे दारुचे उच्चाटन, आणि गावकऱ्यांना न जुमानणाऱ्या गुन्हेगार दारुविक्रेत्यांच्या नियंत्रणासाठी गाव म्हणेल तेव्हा पोलीसांची मदत अशा चतुर्विध कार्यक्रमाने गावांची दारुमुक्ती साकार झाली आहे. यासाठी गावकऱ्यांनी वेगवेगळ्या युक्त्या विकसित केल्या.

- वडधा गावाने गावातील दारु पूर्णपणे बंद केल्यावर "दारु दाखवा व शंभर रुपये बक्षीस मिळवा" अशी घोषणा.

- वासाळा गावातील विविध जाती-जमातीच्या लोकांनी एकत्रित येऊन दारुमुक्ती घोषित केली व गावाभोवती पहारे बसवून ७५ हातभट्ट्या नष्ट केल्या. दारु काढणाऱ्यांना किंवा विकणाऱ्यांना गावाचा दंड लागू केला.

- खुर्सा गावाने गावातील सर्व हातभट्ट्या बंद केल्या व गावाचा नियम मोडून दारु पिऊन येणाऱ्या चुकार पुरुषांसाठी 'कोंडवाडा' बनवला. पिऊन येणाऱ्याला रात्रभर तिथे बंद करुन दुसऱ्या दिवशी गावासमोर न्याय करणे सुरु केले.

- चांदाळा टोला गावातील बायांनी गावाच्या दारुमुक्तीचा नियम तोडून दारु पिऊन आलेल्या पुरुषांना साडी-बांगड्या नेसवून त्यांची धिंड काढली.

- गडचिरोली शहरातील ढीवर मोहल्ल्यातील बायांनी दारुमुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांसाबत दारु विकणाऱ्या हॉटेलांवर 'जनता छापे' मारुन बेकायदेशीर दारु पकडली.

'गाव करी ते राव न करी' हे दारुमुक्तीच्या बाबतीत अक्षरशः खरे आहे. 'गावाची दारुमुक्ती' या संकल्पनेची व्याप्ती वाढून 'आमच्या गावात आम्हीच सरकार' अशा प्रगल्भ निष्कर्षापर्यंत गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी गावे पाहोचलीत.

गावाच्या दारुमुक्तीच्या अंमलबजावणीत येणाऱ्या मुख्य अडचणी आहेत पोलीस व शासनाच्या सहयोगाचा अभाव आणि व्यसनींची दारु पिण्याची अनावर तृष्णा. यावर उपाय शोधण्याची गरज आहे.

- गावातील दारुच्या छोट्या छोट्या केसेससंबंधी न्याय होण्यास पोलीस व न्याय व्यवस्थेमार्फत विलक्षण दिरंगाई, ढिलेपणा व भ्रष्टाचार होतो. या केसेसचा लवकर व समुचित न्याय करण्यासाठी ग्राहक न्यायालयाच्या धर्तीवर स्त्रियांच्या दारुमुक्ती न्यायपंचायती स्थापन करुन त्यांना अधिकार व जबाबदारी द्यावी.

- दारु विकणारा हा समाजाचा गुन्हेगार व दारु पिणारा हा व्यसन नावाच्या रोगाचा बळी आहे. दारुचे व्यसन सुटावे म्हणून 'मुक्तांगण' सारख्या व्यसनमुक्ती केंद्राच्या प्रयोगापासून शिकून प्रत्येक जिल्ह्यातच नव्हे, तर गावागावात व्यसनमुक्तीचे विकेंद्रित कार्यक्रम सुरु व्हावेत.

- धूम्रपान हे आरोग्याला हानिकारक आहे ही जाणीव आता मान्य झाली आहे. पाश्चिमात्य देशांत तर अशी स्थिती निर्माण झाली आहे की धूम्रपान करणारा सभ्य समाजात वाळीत पडतो. वैद्यकीय संशोधन, स्वयंसेवी संघटना, व प्रचार माध्यमे यांच्या संयोगाने हा व्यापक बदल अवघ्या वीस वर्षात घडला आहे. धूम्रपानातंतर पुढचा हल्ला मद्यपानावरच होणे अपरिहार्य आहे. भारतातही अशी फळी निर्माण व्हावी.

- दारु पिणे हे उच्चभ्रूपणाचे लक्षण व दारुबंदी हा मागासलेल्या गांधीवाद्यांचे फॅड मानली जात असतांना एक विलक्षण स्वागतार्ह अनुभव नुकताच आला. गडचिरोली दारुमुक्ती आंदोलनाला समर्थन करणाऱ्या आवाहनाला बाबा आमटे, ना.ग. गोरे, डॉ. उषा मेहता, ठाकुरदास बंग, चंद्रशेखर धर्माधिकारी, शरद जोशी, अण्णा हजारे, तुकारामदादा गीताचार्य, मधुकरराव चौधरी यांसारख्या समाजसेवी धुरीणांनी आपले पाठबळ दिलेच, पण ज्या लेखक-कलावंत वर्गाविषयी मद्यपी अशी प्रतिमा आहे त्या वर्गातून पु.ल. देशपाडे, सुनीता देशपांडे, विजय तेंडुलकर, मंगेश पाडगावकर, श्याम बेनेगल, जब्बार पटेल, सतीश अळेकर, दया पवार, माधव गडकरी, सुनील गावस्कर, अमोल व अनूया पालेकर, दिनकर गांगल, सदाशिव अमरापूरकर या व अशा अनेकांनी गडचिरोलीच्या दारुमुक्ती आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. समाजातील बदलत्या स्थितीची ही चाहूलच आहे.

समाज दारुविषयक धोरणाच्या परिवर्तनाची वाट बघतो आहे.

-----xxxxx-----